# Art & Science College,Pulgaon




Class – B.Com Fourth Sem

Subject  Monetary-Economics

Prof  Abhijt M. Mude



# आधुनिक काळात ई – बॅकींग एक गरज

भारतात माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात फार मोठया प्रमाणात प्रगती झाली आहे. सर्वत्र संगणक आणि 'आंतरजाल' (**Internet**) यांचा उपयोग मोठया प्रमाणावर केला जात आहे. त्यामुळे ई–कॉमर्स, ई– मेल, ई– माहिती, आंतरबदल (**E-Data Interchange**) इत्यादींचे संपूर्ण देशात मोठया प्रमाणावर जाळे तयार झाले आहे. उद्योग, व्यापार, वाहतूक, सरकारी कार्यालये इत्यादी सर्वच ठिकाणी या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग सातत्याने वाढत आहे. बॅकांनी देखील ग्राहकांना मुलभूत आणि आनुषांगिक सेवा पुरविण्यासाठी इलेक्ट्रानिक माध्यमांचा उपयोग सुरू केला आहे. आधुनिक व्यापारी बॅका या 'माहिती–धिष्ठित' (**Information based**) बनल्या आहेत. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांमुळे बॅकांच्या कार्याचा वेग आणि सेवांचा दर्जा वाढण्यास मदत झाली आहे.

# ई–बॅकींगचा अर्थ

ई– बॅकींग मधील 'इ' हे अक्षर ईलेक्ट्रॉनिक्ससाठी वापरण्यात येते. ई– बॅकींगचे संपूर्ण रूप 'ईलेक्ट्रानिक बॅकिंग' असे आहे. ईलेक्ट्रानिक्स माध्यमाचा उपयोग करून केल्या जाणा–या बॅक व्यवसायाला ई–बॅकिंग असे म्हणतात. '' ई–बॅकींगमध्ये बॅका आपल्या सर्व प्रकारच्या व्यवहारांची पूर्तता करण्यासाठी ईलेक्ट्रॉनिक पध्दतीचाच उपयोग करतात. ई– बॅकींगमध्ये प्रामुख्याने इंटरनेटचा उपयोग केला जातो. त्यासाठी सर्व बॅका संगणीकृत(**Computarised**) केल्या जातात. बॅकेचा दैनंदिन व्यवहारात कागदपत्रे किंवा लेजरच्या ऐवजी संगणकाचा उपयोग केला जातो. बॅकेचा कारभार कागदपत्र विरहित ;च्चमतसमेद्ध असतो. व्यवहारांच्या सर्व नोंदी संगणकामध्ये केल्या जातात. देशातील किंवा जगातील सर्व संगणक इंटरनेटने जोडले जातात. त्यामुळै देशातील कोणतीही व्यक्ती इंटरनेटव्दारे बॅकेशी संपर्क साधू शकते. पैसे भरणे, पैशाचे हस्तांतरण करणे;**Transfer**)] पैसे काढणे यासारखे व्यवहार कोणतीही व्यक्ती इंटरनेटव्दारे करू शकते. त्यामुळे ग्राहकांना बॅकेशी व्यवहार करतांना प्रत्यक्षपणे बॅकेत जावे लागत नाही. आपल्या घरी, दुकानात किंवा ऑफिसमध्ये बसून बॅकेशी व्यवहार करता येऊ शकतात. संगणक किंवा (Laptop) यांच्या सहाय्याने ते बॅकेच्या 'संकेत स्थळावर'(**Website**) जाऊन ग्राहक आपले व्यवहार करू शकतात. ग्राहकांना बॅकेत येऊन बराच वेळ थांबावे लागत नाही. आपल्या गरजेनुसार ग्राहक केव्हाही बॅकेशी व्यवहार करू शकतात. त्यामुळे ई–बॅकींग हे ग्राहकांच्या दृष्टीने वरदान ठरले आहे.

# ई– बॅकिंगचे स्वरूप

- ई–बॅकिंग म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स पध्दतीने बॅक व्यवहार करणे होय. ईलेक्ट्रानिक्स बॅकिंगला ‘छत्री’ या संज्ञेची उपमा दिली जाते. ग्राहकाला घरबसल्या रकमेचे शोधन करणे, रकमेचे स्थानांतरण करणे, आपल्या खात्याचे विवरण प्राप्त करणे, खात्यांचे समाशोधन करून घेणे, ईलेक्ट्रॉनिक कॅशचा वापर करणे, इंटरनेटवरील लिलावात भाग घेणे, संभाव्य ग्राहकाबद्‌दल माहिती प्राप्त करणे अशा अनेक बॅकींगच्या सेवा आपल्या पर्सनल कॉम्प्युटरवरून एकाच छताखाली उपलब्ध करून घेता येतात. म्हणूनच वर्ल्ड वाईड वेबच्या माध्यमातून बॅकींगची कामे करणे म्हणजे ई–बॅकींग होय असे म्हटले जाते.



# ई–बॅकिंगची वैशिष्टये आणि घटक

- **1) ग्राहक आणि बॅक (Customer to Bank) :** ग्राहक आणि बॅक यांच्यातील व्यवहार हे प्रामुख्याने इंटरनेटवर आधारित असणे हे ई–बॅकींगचे वैशिष्टये आहे. देशातील विविध बॅका आपल्या ग्राहकांसाठी बॅकींगच्या सर्व सोयी, सुविधा इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध करून देतात. ग्राहकांनी आपला संगणक इंटरनेटवरून बॅकेच्या वेबसाईटच्या माध्यमातून आपल्या बॅकेशी कनेक्ट केला म्हणजे ग्राहक बॅकेने उपलब्ध करून दिलेल्या सर्व सोयींचा व सेवांचा उपयोग करून घेऊ शकतो. बॅकेच्या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) बॅकेची माहिती, निक्षेप, कर्ज, कर्जप्रकार, व्याजदर, बॅकेच्या शाखा, विविध देयकांची शोधन पध्दती, पैसे स्थानांतरणाची पध्दती, पतपत्रे, विविध ठेव आणि कर्जे यांची सविस्तर माहिती दिलेली असते. ग्राहक या सर्व सेवांचा उपयोग विनाविलंब घेऊ शकतो. या व्यवहारांमध्ये वेळेची, काळाची मर्यादा नसते. कार्यालयीन कामकाजाच्या वेळेची मर्यादा नसते. ग्राहक आपल्या सोयीनुसार या सर्व सुविधांचा उपयोग वर्षाचे 356 दिवस तसेच दिवसांचे24 तास आणि आठवडयांचे सातही दिवस घेऊ शकतो यालाच 24ग 7 योजना असे म्हणतात

# ई–बॅकींगव्दारे ग्राहक पुढिलप्रकारचे व्यवहार करू शकतो.

- पैशाचे हस्तांतरण करणे
- बॅकेतील आपल्या खात्यातील शिल्लक रक्कम माहिती करणे.
- विज, टेलिफोन, पाणी इत्यादी बिल भरणे.
- विम्याच्या हप्त्यांचे शोधन करणे.
- खात्याचे विवरण मागविणे.
- कर्जासाठी अर्ज करणे.
- चेकबूक, बॅकड्राफ्ट, पतपत्रे यांच्यासाठी अर्ज करणे.
- विपणीतील व्यवहारांचे तात्काळ शोधन करणे.
- ठेवींमध्ये रक्कम जमा करणे.
- आयकर व अन्य करांचे शोधन करणे.
- रेल्वे, बस, विमान इत्यादींचे तिकीट बुक करणे.
- हॉटेल बुक करणे
- विविध परिक्षांचे शुल्क भरणे.
- भाग व ऋणपत्रांच्या खरेदी विक्रिचे व्यवहार करणे.
- ऑन लाईन शॉपींग करणे.
- अशाप्रकारच्या अनेक सेवा घरबसल्या अत्यंत कमी वेळेत आपल्या सोईने ग्राहक बॅकेकडून प्राप्त करू शकतो. सद्यस्थितीत या क्षेत्रात दररोज नवीन शोध लागत असून नवनवीन अद्यावत सेवा बॅका आपल्या ग्राहकांना इंटरनेटच्या माध्यमातून प्रदान करीत आहेत.